# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

**वार्षिक पारितोषिक व गुणगौरव समारंभ** =

प्रभात पुणे, बुधवार, दि. ३ फेब्रुवारी २०१६

# कॉलेजच्या मोरपंखी जीवनात करिअरवरही लक्ष द्या

## अभिनेत्री अमृता खानविलकरचे आवाहन : राजगुरू महाविद्यालयात पारितोषिक वितरण



राजगुरुनगर : येथे राजगुरू महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभ कार्यक्रमावेळी अभिनेत्री अमृता खानविलकर हिला पाहण्यासाठी, ऐकण्यासाठी विद्यार्थिनींनी मोठी गर्दी केली. इन्सेटमध्ये अमृता खानविलकर.

राजगुरुनगर, दि. २ (प्रतिनिधी) - कॉलेजच्या जीवनातील मोरपंखी दिवस विद्यार्थ्यांनी आनंदाने जगताना आपल्या आवडत्या क्षेत्राचा करिअरच्या दृष्टीनेही विचार करावा, असे आवाहन प्रसिद्ध सिनेअभिनेत्री अमृता खानविलकर हिने केले.

येथील राजगुरू महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अमृता बोलत होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या वेळी संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, माऊली करंडे, निर्माता अमोल काळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. बी. शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रसिद्धी प्रमुख डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विद्यापीठ प्रतिनिधी आकाश नवरे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

अमृता खानविलकरने महाविद्यालयातील मुलींच्या संख्येचा गौरवाने उल्लेख करताना अशा प्रकारचे सुरक्षित वातावरण देशात निर्माण होण्याची गरज व्यक्त केली. चित्रपटसृष्टीत यश मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्नांची गरज असते. स्वतःला वारंवार सिद्ध करावे लागते. तेथील यश हे कायम नसते; त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात कष्टाशिवाय पर्याय नाही. गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करताना जीवनात यश मिळविण्यासाठी प्रचंड कष्ट करा, यश तुम्हाला नक्की मिळेल. विद्यार्थ्यांनी फक्त गुणांसाठी शिक्षण न घेता आपले आयुष्य घडविण्यासाठी शिक्षण घेण्याचे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी वार्षिक अहवाल वाचन करून महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेतला. ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी महाविद्यालयातील क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग, कला, वाणिज्य, विज्ञान, बीसीए, बीसीएस, एमसीव्हीसी आणि कम्युनिटी कॉलेजमधील गुणवंत विद्यार्थ्यांना सिनेअभिनेत्री अमृता खानविलकर यांच्या हस्ते चषक, प्रशस्तीपत्रक आणि रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला.

> विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था महाविद्यालयाच्या माध्यमातून सातत्याने प्रामाणिक प्रयत्न करीत असत. साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेच्या माध्यमातून आज महाराष्ट्रात या महाविद्यालयाची ओळख वैचारिक बैठक असलेले महाविद्यालय अशी झाली आहे. याचे श्रेय त्यांनी संस्था-महाविद्यालयाशी संबधित सर्व घटकांना जाते. आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभिनयाच्या क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख असलेल्या अमृता खानविलकर यांना पहायची, ऐकायला मिळण्यामागे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे हेच कारण आहे.
>
> -ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, अध्यक्ष, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. टाकळकर यांनी केले तर [illegible] प्रा. खेत्रे यांनी केला.




हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात अमृता खानविलकर यांच्या हस्ते पारितोषिक देताना देवेंद्र बुट्टे-पाटील, प्राचार्य एस. बी. पाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, अॅड. राजमाला बुट्टे-पाटील, उपप्राचार्य जी. बी. शिंदे.

# यशस्वी जीवनासाठी कष्टाशिवाय पर्याय नाही : खानविलकर

**राजगुरुनगर :** आवडत्या क्षेत्रात करिअर करा, पण क्षेत्र आवडते असले, तरी कष्टांना पर्याय नसतो, हेही लक्षात ठेवा. यशस्वी जीवनासाठी कष्टाशिवाय पर्याय नाही. पण शिक्षण घेऊन आयुष्य घडवायचे आहे, याचाही विसर पडू देऊ नका, असा सल्ला प्रसिद्ध सिनेअभिनेत्री अमृता खानविलकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील होते. याप्रसंगी संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, ज्ञानेश्वर करंडे, निर्माता अमोल काळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. बी. शिंदे, प्रबंधक कैलास पाचरणे, विद्यापीठ प्रतिनिधी आकाश नवरे आदी उपस्थित होते.

◆ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था महाविद्यालयाच्या माध्यमातून सातत्याने प्रामाणिक प्रयत्न करीत असते. साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेच्या माध्यमातून आज महाराष्ट्रात या महाविद्यालयाची ओळख वैचारिक बैठक असलेले महाविद्यालय अशी झाली आहे. याचे श्रेय त्यांनी संस्था-महाविद्यालयांशी संबंधित सर्व घटकांना आहे.

या वेळी खानविलकर म्हणाल्या,''विद्यार्थ्यांनी फक्त गुणांसाठी शिक्षण न घेता आपले आयुष्य घडविण्यासाठी शिक्षण घ्यावे. मुलींसाठी सुरक्षित वातावरण देशात निर्माण होण्याची गरज आहे. चित्रपटसृष्टीत यश मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्नांची गरज असते. स्वतःला वारंवार सिद्ध करावे लागते. तेथील यश हे कायम नसते. शेवटी कोणत्याही क्षेत्रात कष्टांना पर्याय नसतो. यश मिळविण्यासाठी प्रचंड कष्ट करा, यश तुम्हाला नक्की मिळेल.''

अभिनयाच्या क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख असलेल्या अमृता खानविलकर यांना आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना पाहायची, असे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी सांगितले.

या प्रसंगी महाविद्यालयातील क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग, कला, वाणिज्य, विज्ञान, बीसीए, बीसीएस, एमसीव्हीसी आणि कम्युनिटी कॉलेजमधील गुणवंत विद्यार्थ्यांना अमृता खानविलकर यांच्या हस्ते चषक, प्रशस्तिपत्रक आणि रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख